# जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
## सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

## जाहिर प्रकटन

जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती-2023 अन्वयें जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत घेणेत आलेल्या ऑनलाईन परीक्षेअंती गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून **पशुधन पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) या तीन संवर्गातील पात्र उमेदवारांची तात्पूरती निवड यादी व वरिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी (कृषी), कनिष्ठ अभियंता (विदयुत), तारतंत्री, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), कनिष्ठ लेखाधिकारी** या **सहा** संवर्गातील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने त्यापुढील उमेदवारांचा समावेश करुन तात्पुरती निवड यादी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या **https://www.zpsindhudurg.maharashtra.gov.in/** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

प्रसिध्द करणेत आलेल्या जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत **पशुधन पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वरिष्ठ सहाय्यक (लिपीक),वरिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी (कृषी), कनिष्ठ अभियंता (विदयुत), तारतंत्री, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), कनिष्ठ लेखाधिकारी** या **नऊ** संवर्गातील घोषित रिक्त पदांकरीताचे तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांचे मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करीता दिनांक - **२०.०३.२०२४** रोजी सकाळी **१०-३०** वाजता जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे आयोजन करणेत आलेले आहे.

मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व मूळ दस्तऐवज सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबत जोडणेत आली आहे. त्यानुसार आपण नमूद मूळ आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज व त्यांची 2 स्वसाक्षांकित प्रतीसह दिनांक **२०.०३.२०२४** रोजी सकाळी **१०-३०** वाजता "श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह", जिल्हा परिषद सिंधुदुर्ग (दुसरा मजला), सिंधुदुर्गनगरी येथे न चुकता उपस्थित रहावे. तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश असणाऱ्या व कागदपत्र पडताळणीकरीता पाचारण करणेत आलेल्या उमेदवारास अंतिम निवडीचा कोणताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उक्त दिनांक **२०.०३.२०२४** रोजी सकाळी **१०-३०** वाजता कागदपत्रे/दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घ्यावी. कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

कागदपत्र पडताळणी अंती अंतिम निवड यादी मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीचे मान्यतेनंतर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करणेत येईल.

क्र.सिंजिप/साप्रवि/आस्था-१/3106/२०२४
**दिनांक** :- ११.०३.२०२४
**स्थळ** :- सिंधुदुर्गनगरी

(किशोर काळे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

**कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

सदर परीक्षेच्या निकालानंतर तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| २ | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ३ | वयाचा पुरावा |
| ४ | जन्माचा पुरावा |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ६ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र |
| ७ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षातील) |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| १० | खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १३ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १४ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १५ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १६ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन |
| १७ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १८ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| १९ | टंकेलेखन प्रमाणपत्र |
| २० | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २१ | अनुभव प्रमाणपत्र |

**(किशोर काळे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)**
**तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**